REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2025

# नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कविता

लता किसन शिंदे
पीएच.डी. संशोधक विद्यार्थी
मराठी विभाग, पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ,सोलापूर




नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कविता लिहिणारे नवोदित कवी अस्सल ग्रामीण जीवनात वावरणारे असून त्यांच्या आत्मविष्काराची ही ग्रामीण कविता प्रकर्षाने पुढे आलेली दिसते. नव्वद नंतरच्या अनेक ग्रामीण कवीनी मराठी कवितेतून त्याचा वेध घेतलेला आहे. जागतिकीकणाचा परिणाम चित्रीत करणारे कवीनी आपल्या ग्रामीण कवितेतून ग्रामीण शेतकरी जीवनाला अधिक स्थान दिलेले आहे. या काळातील कवींनी त्या त्या भौगोलिक प्रदेशाचे लोक जीवन, निसर्ग आणि परिसराची तीव्रता कमी अधिक प्रमाणात केली असली तरी एकूण ग्रामीण जीवनाचा त्यांचा आविष्कार एकाच तीव्रतेचा आणि पोटतिडिकेचा आहे, यात शंका नाही. नव्वदनंतरची मराठी कविता विविधतेने नटलेली समृध्द ग्रामीण कविता असे तिचे वर्णन करता येईल. शिक्षण प्रसार, दुर्बलांना शिक्षण सवलती, महाविद्यालयाचे जाळे, ग्रामीण साहित्य, चळवळ, विभागीय साहित्य संमेलने, चर्चासत्रे, कवी संमेलने, मेळावे यामुळे नव्या पिढीची वाङ्मयीन मशागत होऊ लागली. प्रतिभेला अंकुर फुटले, आत्मभान जागृत झाले आणि आपणच आपले जीवन अभिव्यक्त करावे असे वाटू लागले. यातून नवी ग्रामीण कविता बहरली ती सशक्त उभी आहे. नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कविता आश्वासक अशा स्वरुपाची समाधानकारकता देणारे आहेत. उदा. 'रानवेल' (१९९६), 'कोरडे नक्षत्र' (१९९७), 'पाणडोह' (१९९७), 'उजाळा' (२०००), 'पेरा' (२००२), 'अंतरीचा भेद' (२००२), 'शिवारातल्या कविता' (२००२), 'वसाण' (२००२), 'कुणबी बाप' (२००२), 'कुणब्याची कविता' (२००३), 'आषाढ माती' (२००३), 'मेघवृष्टी' (२००५), 'पाढा' (२००६), 'इशारा' (२००७), हे काही लक्षणीय ग्रामीण कविता संग्रह मराठीत स्वतंत्र क्षमतेवर उभे आहेत या कविता संग्रहातून ग्रामीण कवीनी ग्रामवास्तव आणि खेडी शहरे यांच्यातील अंतवि1ध दमदारपणे प्रगट केला आहे.

नव्वदोत्तरी मराठी कवी प्रकाश होळकर, जगदीश कदम, नारायण सुमंत, बालाजी इंगळे, ललित अधाने, अशोक कौतीक, कोळी प्रसाद माने, कैलास दौंड, दिलीप पाटील, बाबाजी येवले, नरेश मोरे, सुनंदा पाटील, प्रेमा धुले, अरविंद भुजबळ, स्मिता शानबाग, श्रीराम गव्हाणे, लक्ष्मण महाडिक, पांडूरंग सुतार, प्रकाश किनगांवकर, मोहन बाबरे, माधव कदम, बबन शिंदे ही कवी मंडळी ग्रामीण जीवन काव्यातून वास्तवतेने बळी राजाची व्यथा

वेदना मोठ्या ताकदीने कवितेत मांडत आहेत. शेतकऱ्याचे दैन्य, दारिद्रय, घुसमट याला वाचा फोडत आहेत. एकूणच ग्रामीण जीवनाचा आलेख काव्यातून मांडत आहेत.

नव्वदोत्तरीचा नवोदित कवी लक्ष्मण महाडीक म्हणतात आज ग्रामीण जीवन भकास होत चाललीली आहे. दुष्काळामुळे खेडी उध्वस्त होत चाललीली आहेत. पाऊस वेळेवर पडत नाही त्यामुळे शेतकऱ्याचे जीवन निसर्गावर अवलंबून असते. परंतु निसर्ग हा लहरी होऊन गेला आहे. दुष्काळ पडला तर पुढारी फक्त घोषणाचा पाऊस पाडतात अशा प्रकारचे ग्रामीण जीवनाचे वर्णन 'घोषणांच्या बेमोसमी पावसात' या कवितेत लक्ष्मण महाडीक म्हणतात –

"आज परांगदा झालीत माणसं
वांझ झालीत खेडी
अन शहरांना तर दिवस गेले
खेड्याकडे चला म्हणणारे गांधीजी
आज कुठे गेले
शासन सत्तेचे आसन झाले
अन देव घरातील देव न्हाऊन नुसतेच
खाली बासन ओले"

जागतिकीकरणामुळे वेगाने होणारे औद्योगिकीकरण, नागरीकरण आणि खेड्याकडे होणारे दुर्लक्ष यांचे चित्रणही ग्रामीण कवीनी केलेले आहे.

आज ग्रामीण जीवनात वीजेचा वाढत्या वापराबरोबर वीज टंचाई व पाण्याचे दुर्भिक्ष या विषयी अशोक कोळी गावाकडल्या कविता या संग्रहातील 'शिरपा' ची प्रातिनिधिक व्यथा मांडताना म्हणतात –

'किदरला असा, डोळा नाही नीज
आटलेली हिर कधी नाही वीज
हावरटपणी, इचकली गोठ
बिगी बिगी गेलं, कपारीत पोट'

बदलल्या काळात वीज, पाणी टंचाई यासारख्या नवीन प्रश्नांमुळे शेतकऱ्यांची झोप उडाली आहे. यांचे यथार्थ चित्रण अशोक कोळीनी आपल्या कवितेतून मांडले आहे.

इंद्रजित भालेराव हे नव्या पिढीतील संवेदनशील प्रतिभावान ग्रामीण कवी म्हणून उदयास आले. शेतकऱ्याच्या उपकाराची कृतज्ञ भावना व्यावहारिक जगात जाणवत नाही यांचे मनस्वी दुःख कवीस आहे. त्यामुळेच कवी म्हणतो.

सांग माझ्या बापानं नाही केला पेरा
तर तुम्ही काय खाल ? धत्तुरा ?

शेतकऱ्यांचे कष्ट कुणीही जाणत नाही त्यांच्या मालाची मातीमोल किंमत करुन त्यास लुटले जाते हे वास्तव कवीने मांडले आहे. शेतकरी कर्जातच जन्मतो आणि कर्जातच मरतो हे सत्य मांडतांना कवी संघर्षाची रोखठोक भाषा वापरतो.

'शीक बाबा शीक लढायला शीक
कुणब्याच्या पोरा आत लढायला शीक'

अशी संघर्षाची आणि हक्काची भावना शेतकऱ्यात येणे आवश्यक आहे, ही कवीची आंतरिक तळमळ येथे व्यक्त झालेली आहे.

आज ग्रामीण जीवन भयावह झालेले आहे, बेभरवशाचा पाऊस, पीकलं तर भाव नाही असे आस्मानी सुलतानी संकंट शेतकऱ्यांवर नेहमीच येत असते या संदर्भात सुरेश शिंदे 'पुस्तकात नसलेली पान' या काव्य संग्रहातील कवितेत म्हणतात.

कागदावर काळ करण्या इतकं
सोप असतं काय
मातीला हिरवं करण ?
तिचं मढ झाकून
जीवन वापशावर पेरावा लागतो
तेव्हा उगवतो हिरवा कोंभ
बाबानो !
तुमच्या आकड्यांना
आणि अक्षरांना
जर कणसं आली असती
तर माझ्या डिग्रीला
वाळवी लागली नसती
मग माझ्या बापानं
आत्महत्या का केली असती ?

अशा या आधुनिक युगात ही ग्रामीण जीवन कसे उध्वस्त झाले आहे. शेतकऱ्याचे दुःख व्यथा, वेदना प्रत्येक वाचकाला अंतर्मुख करणारी आहे.

नारायण सुमंत यांच्या 'सातबारा' या काव्य संग्रहातील कवितेतही आजच्या भ्रष्ट समाज जीवनाचे आणि सामान्य शेतकऱ्याचे विदारक जीवन आपल्या कवितेतून मांडले आहे. शेतकरी जीवनाची आर्थिक आणि सामाजिक शोकांतिका त्यांनी कवितेतून बोलकी केली. ती वाचकांचे अंतःकरण पिळवटून टाकते ते म्हणतात.

पिकत नाही माल
तर दुःख पिकवायला शीक
विकत नाही माल
तर दुःख विकायला शीक

दुःख पिकविणे आणि तेच सतत समाजाच्या बाजारहाटात मांडणे शेतकऱ्यांच्या नशिबी कायमचे आहे, हे वास्तव कवीने मांडले आहे.

जगदीश कदम यांनी आपल्या 'उजाळा' या आपल्या कविता संग्रहातील कवितेतून ग्रामजीवनाचे प्रश्न समस्या, हालअपेष्टा इ. उल्लेख आहे. लहरी पावसामुळे शेतक-याचं जगणं कसं उद्‌ध्वस्त होत हे सांगतांना कवी म्हणतो

"येता दुबार पेरणी
कशी जुपावी तिफण
सरकारचा तगादा
आधी फेडा जुन रीन"

सावकाराचं कर्ज, मुलांची शिक्षणे, मुलींचे लग्न, दुष्काळ या सर्व समस्यामुळे तो शेतकरी पुरता कोलमडून पडला आहे. यातून सुटका व्हावी म्हणून तो आत्महत्या करतो हे वास्तव कवीने येथे मांडले आहे.

थोडक्यात नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कविता लक्षणीय प्रमाणात बदलत गेली आहे या कवितेने जगण्यातली नवी धग धरुन ठेवली आहे. वर्तमान नवी भाषा या कवितेने आत्मसात केली आहे. ही कविता फक्त दुःख किवा नव्या पिढीचा शहाणपणा मिरवणारी नाही तर ही कविता जगण्यापासून अलग होत नाही.

मातीचा संस्कार ती नाकारत नाही ही कविता बदलत्या वर्तमानाचे विस्कळीत ग्रामजीवनाचे चित्रण करते. आजची ग्रामीण कविता संवेदनगर्भ आणि चिंतनगर्भ आहे. यात शंका नाही या कवितेने ग्राम संवेदन मोठ्या धाडसाने प्रगट केले आहे. घर आणि शिवार यांच्यात 'जागर' उत्पन्न करण्याची क्षमता घेऊन आलेली ही आजची मराठी ग्रामीण कविता आहे.

## संदर्भ सूची :-

१) लक्ष्मण महाडीक, 'कुणब्यांची कविता', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर प्रथमावृत्ती – डिसेंबर २००३.

२) इंद्रजित भालेराव, 'टाहो' प्रतिभास प्रकाशन, परभणी, प्रथमावृत्ती - २००४.

३) नारायण सुमंत, 'सातबारा', श्री विद्या प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती - २००४.

४) सुरेश शिंदे, 'पुस्तकात नसलेली पान', सुविधा प्रकाशन, सोलापूर प्रथमावृत्ती – २००५.

५) कोळी अशोक कौतीक, 'गावाकडल्या कविता', साक्षात प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती – नोव्हेंबर-२००८.